(१०)

महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. २०८८ दि.- १३/०७/२०१८

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक – १२/०७/२०१८ दिनांक – सकाळी ११.३० वा.

स्थळ – महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,

**श्री. शेखर मधुसुदन बलकवडे**
८७/६९७, महर्षिनगर,
पुणे ४११०३७.
} **अपिलार्थी**

**श्री. विक्रम काथवटे**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
} **जनमाहिती अधिकारी तथा** वरिष्ठ आरोग्य निरिक्षक

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

श्री.शेखर मधुसुदन बलकवडे (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक १०/०५/२०१८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांना दिनांक १०/०५/२०१८ रोजी प्राप्त झाला असता, सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरिक्षक , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांचेकडे वर्ग करणेत आलेला आहे. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी निसर्ग मंगल कार्यालयाच्या भिंतीलगत सरगम बंगल्याच्या समोर असलेला (पडलेला) राडारोडा संबंधित मालकांना बजावलेल्या नोटीस अथवा त्यांना केलेल्या दंडाच्या पावत्यांबाबतची माहिती विचारलेली होती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| १०/०५/२०१८ | १०/०५/२०१८ | ०९/०६/२०१८ | – | – |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती न मिळाल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक १८/०६/२०१८ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| १८/०६/२०१८ | १८/०६/२०१८ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ – दि.१२/०७/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता – उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी – उपस्थित
सुनावणी सहा. जनमाहिती अधिकारी – उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील –**

| क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| मुद्दा क्र.१ | नसर्ग मंगल कार्यालयाच्या भिंतीलगत सरगम बंगल्याच्या समोर असलेला (पडलेला) राडारोडा संबंधित मालकांना बजावलेल्या नोटीस अथवा त्यांना केलेल्या दंडाच्या पावत्यांची सत्यप्रती मिळणेबाबत. | माहिती देणेत आलेली नाही. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक १२/०७/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री. शेखर मधुसुदन बलकवडे हे उपस्थित होते. सदर दिनांकास श्री.विक्रम काथवटे, जनमाहिती अधिकार तथा वरिष्ठ आरोग्य निरिक्षक, श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा आरोग्य निरिक्षक श्री. सुजय ठकार हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री. शेखर मधुसुदन बलकवडे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जाची माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

वरीलप्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'</u>**

- जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अर्जात नमूद बाबीची माहिती न देणेबाबत केलेल्या विवेचनामुळे व अपिलार्थी यांच्या सुनावणी दरम्यानच्या मागणीनुसार अर्जात नमूद ठिकाणचा राडारोडा येत्या ५ दिवसात उचलून घेण्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी सांगितल्याने अपिलार्थी श्री.शेखर मधुसुदन बलकवडे यांचे समाधान झाल्याने सदरचा अपिल अर्ज निकाली काढणेत येत आहे. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांची माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

13.07.18

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

<u>टिप –</u>

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे – ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत –

१. श्री.शेखर मधुसुदन बलकवडे, ८७/६९८, महर्षिनगर, पुणे – ४११०३७.
२. श्री. विक्रम काथवटे जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरिक्षक , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
३. मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
४. श्री.सुजय ठकार सहा.जनमाहिती अधिकारी तथा आरोग्य निरिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.